महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे कार्यालय

<u>परिपत्रक</u>

क्रमांक-एमएलएस २१२०००/४२४१३/२१८/५अ, मुंबई १६ नोव्हेंबर२०००

मळीवरील किंमतीचे निर्बंध जून १९९३ मध्ये उठविल्यानंतर मळीवरील पर्यवेक्षण रद्द करण्यात येऊन मळीच्या राज्यांतर्गत वाहतुकीचे परवाने मंजूर करण्याचे अधिकार संबंधित साखर कारखान्यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यामुळे मळीवर आकारा-वयाच्या वाहतूक शुल्काची वसुली स्वतः साखर कारखान्यांने करावयाची असल्याने सदर वसुलीकडे विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे, मळीच्या आयात/निर्यात/वाहतूक परवाने मंजुरीसंबंधी होणारी कार्यवाही नियमांतील तरतुदीस अनुसरुन होत नाही असेही निदर्शनास आले आहे. बऱ्याच त्रुटी अथवा चुकीच्या दराने शुल्क वसुली करणे इत्यादि बाबी निदर्शनास आल्या आहेत. आयात/निर्यात करावयाच्या मळीवरील पर्यवेक्षण शुल्काच्या दरा-बाबतही एकसूत्रता अवलंबण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सबब ह्या परिपत्रकाद्वारे मळी वाहतूक/आयात/निर्यात परवाने मंजुरीबाबत व वसूल करावयाच्या शुल्काबाबत विस्तृत सूचना पुढीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

क्र. ४६५० दि. २०/११/२०००

१. मळीची राज्यातील वाहतूक
२. मळीची परराज्यात निर्यात
३. मळीची परदेशातील निर्यातीकरिता वाहतूक
४. मळीची परराज्यातून स्वतःच्या वापरासाठी/देशाबाहेर निर्यातीकरिता आयात
५. मळीची थेट वाहतूक[Through Transport]इत्यादि

<u>१]मळीची राज्यातील वाहतूक</u>

अ. "एम-१"अनुज्ञप्तीधारकाकडून स्वतःच्या आस्थापनेत मळीची वाहतूक मुंबई मळी नियमावली, १९५५च्या नियम १८ व १९मधील तरतुदीनुसार नमुना "एम-६" वाहतूक परवान्यावर होईल. शासन आदेश गृहविभाग क्र. बीपीए १०९३/५/पीआरआ३] २, दिनांक १६.१०.१९९३नुसार नमुना "एम-६" वाहतूक परवाना मंजुरीचे अधिकार "एम-१"अनुज्ञप्तीधारक किंवा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी [म्हणजेच सहकारी साखर कारखान्यात चीफ केमिस्ट इत्यादि]यांना देण्यात आलेले आहेत. उपरोक्त नियमांच्या नियम १९ नुसार नमुना "एम-६"परवाना मंजूर करताना प्रति टन रु. १/-वाहतूक शुल्क वसूल होणे आवश्यक आहे. दिनांक २२ मार्च १९९४पासून उपरोक्त नियमाच्या परंतुका



-२-

नुसार "एम-१"अनुज्ञप्तीधारकाच्या स्वतःच्या आसवनीत मद्यार्क निर्मितीसाठी मळी वितरीत होत असेल तर वाहतूक शुल्क आकारता येत नव्हते मात्र शासन अधिसूचना गृहविभाग क्र.एमएलएस १०९६/१/१६/इएक्सशी २, दिनांक १२ जुलै १९९९नुसार सदर व परंतुक वगळण्यात आला आहे. त्यामुळे वर नमूद केल्याप्रमाणे स्वतःच्या आसवनीस मळीचे वितरण करताना प्रति टन रु.१/-वाहतूक शुल्क भरणे आवश्यक आहे. दिनांक १६.१०.१९९३च्या उक्त आदेशामुळे परवाना मंजुरीचे अधिकार एम १ अनुज्ञप्तीधारकास दिल्यामुळे वाहतूक शुल्क वसुल होते किंवा कसे हे बघण्याची जबाबदारी आसवनीच्या प्रभारी अधिकाऱ्यावर या परिपत्रकाद्वारे निश्चित करण्यात येत आहे. तसेच दिनांक १२.७.१९९९नंतर अशा प्रकरणात वाहतुक शुल्क वसूल झाले अथवा कसे ह्याची खात्री करुन घेण्याची तसेच वसुली झाली नसल्यास वाहतुक शुल्क त्यावरील व्याजासह वसुली हे परिपत्रक निर्गमित केल्यापासून दोन महिन्यात करण्याची जबाबदारी जिल्हाअधीक्षक यांची राहिल.

ब] "एम-१"अनुज्ञप्तीधारकाकडून मळी [मद्यार्क निर्मितीसाठी]राज्यातील दुसऱ्या आसवनीस वितरीत होत असेल तर त्यासाठी उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे वाहतूक परवाना नमुना एम ६ मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल. मात्र मळीवरील वाहतूक शुल्क वसूल केले जाते किंवा कसे हे पहाण्याची जबाबदारी "एम-१"घटक ज्या कार्यकारी राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्याच्या अधिकार क्षेत्रात येतो त्या कार्यकारी दुय्यम निरीक्षकावर निश्चित करण्यात येत आहे.

क] "एम-१" अनुज्ञप्तीधारकाकडून "एम-३"अनुज्ञप्तीधारकास मळी वितरीत होत असताना परिच्छेद १ अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वाहतूक परवाना मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल व वाहतूक शुल्क वसूल झाले किंवा कसे हे बघण्याची जबाबदारी"एम-१" घटक ज्या दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या अधिकार क्षेत्रात येतो.त्या अधिकाऱ्यावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त "ब" व "क"येथे नमूद केल्याप्रमाणे १२.७.१९९९पासून वाहतूक केलेल्या मळीवरील शुल्क भरले असल्याची खात्री दोन महिन्यात करण्याची व संबंधित साखर कारखान्याने शुल्काचा भरणा केला नसल्यास त्याची व्याजासह वसुली उपरोक्त सुनिश्चित करण्याची जबाबदारी अधीक्षकांवर सोपविण्यात येत आहे.

२]मळीची परराज्यात निर्यात

भारतातील दुसऱ्या राज्यात मळी निर्यात करावयाची असेल तर निर्यातदाराने मुंबई मळी नियमावली १९५५च्या नियम १४ मधील तरतुदीनुसार "एम-१"घटक ज्या जिल्ह्यात स्थित आहे त्या जिल्हाधिकाऱ्यांकडे नमुना "एम-५"अनुज्ञप्तीसाठी अर्ज करावा लागतो. निर्यात करावयाच्या परिमाणाचे रु.५०/-प्रति टन पर्यवेक्षण शुल्क शासन

अधिसूचना क्र. एमएलएस १५९५/५/इएक्सती २ दिनांक ६.१२.१९९६नुसार वसूल करणे आवश्यक आहे. निर्यातदारास निर्यात करावयाच्या परिमाणास जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतर वरील-विहित दराने पर्यवेक्षण शुल्क वसूल करण्याची जबाबदारी जिल्हा अधीक्षकांवर निश्चित करण्यात येत आहे. पर्यवेक्षण शुल्काव्यतिरिक्त नमुना "एम-५"अनुज्ञप्तीसाठी रु.५०/- प्रति अनुज्ञप्ती अनुज्ञप्ती शुल्क वसूल करणेसुध्दा आवश्यक आहे.

मळीच्या निर्यातीकरिता एम-५ परवाना मंजुर करण्यापूर्वी संबंधित राज्याच्या अबकारी अधिकाऱ्याकडून आयात परवाना/ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे.

३]मळीची परदेशातील निर्यातीकरिता वाहतूक

अ. मुंबई दारुबंदी कायदा १९४९च्या कलम २[१६]नुसार निर्यात म्हणजे "सीमा शुल्क सरहद्दीच्या व्यतिरिक्त राज्याबाहेर नेणे" म्हणजेच महाराष्ट्रातून देशातील एखाद्या राज्यात मळी इत्यादिचे वितरण/वाहतूक होणाऱ्यास सदर कायद्यान्वये निर्यात म्हणतात[उपरोक्त परिच्छेद २ मध्ये विहित केल्याप्रमाणे]परदेशातील निर्यातीस उक्त कायद्यान्वये निर्यात म्हणता येणार नाही. सबब मुंबई मळी नियमावली १९५५ अंतर्गत देण्यात येणारी नमुना"एम-५"निर्यात अनुज्ञप्ती परदेशातील निर्यातीस मंजूर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. भारतीय बनावटीचे विदेशी मद्य [IMFL]परदेशात निर्यात करण्यासाठी महाराष्ट्र IMFL [बंधित वाहतूक व निर्यात]नियम १९६८च्या नियम ६ अन्वये सीमा शुल्क विभागाच्या बंधित वखारी पर्यंत वाहतुकीसाठी "Transport-in-bond"परवाना नमुना "बी"मंजूर करण्याच्या तरतुदी आहेत. मात्र अशा तरतुदी मळीसाठी नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ब] "एम-१"अनुज्ञप्तीधारकाकडून मळीची परदेशात वाहतूक करावयाची असल्यास दिनांक ६.१२.१९९६च्या अधिसूचनेनुसार सीमा शुल्क सरहद्दीच्या बाहेर मळीची वाहतूक या विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या पर्यवेक्षणाखाली झाली पाहिजे व त्यासाठी पर्यवेक्षण शुल्क रु.५०/- प्रति टन वाहतुकदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे. सदर वाहतूक ही मुंबई मळी नियमावली १९५५च्या नियम १८ व १९मधील तरतुदीनुसार करण्यात येईल मात्र मळीची वाहतूक सीमा शुल्क सरहद्दीच्या बाहेर करावयाची असल्यामुळे नमुना "एम-६"वाहतूक परवाना ज्या जिल्ह्यात "एम-१"स्थित आहे त्या जिल्ह्याच्या जिल्हा अधीक्षकांनी मंजूर करावा. वाहतुकदाराकडून प्रति टन रु.५०/- पर्यवेक्षण शुल्क वसूल झाले किंवा कसे हे पहाण्याची जबाबदारी "एम-६"वाहतूक परवाना मंजूर करणाऱ्या अधीक्षकांची राहील.

क] राज्यातील मळीचा साठा केलेली ठिकाणे[एम ३ अनुज्ञप्तीधारक]यांच्याकडून मळीची परदेशात निर्यात करावयाची असल्यास परिच्छेद ३ ब प्रमाणे कार्यवाही करावी लागेल. मात्र सदर"एम-३"अनुज्ञप्तीधारकांकडे"एम-१"अनुज्ञप्तीधारकांकडून मळी आलेली

असल्यास त्यावर पर्यवेक्षण शुल्काची वसुली आधीच झालेली असेल[मळी परदेशात वाहतूक करावयाची असल्यामुळे]सबब "एम-३"अनुज्ञप्तिधारक ज्या जिल्ह्यात स्थित असतील त्या जिल्ह्याच्या अधीक्षकांनी पर्यवेक्षण शुल्क वसूल झाल्याची खात्री करुन मग कोठलेही शुल्क न आकारता नमुना "एम-६"वाहतूक परवाना मंजूर करावा.

४]मळीची परराज्यातून स्वतःच्या वापरासाठी/देशाबाहेर निर्यातीकरिता आयात

राज्यातील "एम-२"अथवा "एम-३" अनुज्ञप्तीधारकास परराज्यातून मळी आयात करावयाची असल्यास मुंबई मळी नियमावली, १९५५च्या नियम १२ व १३मधील तरतुदीनुसार ज्या जिल्ह्यात आयातदाराची एम२/एम ३ अनुज्ञप्ती स्थित असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून नमुना "एम-४"मध्ये आयात अनुज्ञप्ती मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असलेले अनुज्ञप्ती शुल्क रु.५०/-प्रति अनुज्ञप्ती वसूल करण्याची जबाबदारी जिल्हा अधीक्षकांवर निश्चित करण्यात येते.

५]मळीची थेट वाहतूक[Through Transport ]

अ. परराज्यातून आलेली मळी जर दुसऱ्या राज्यात जाण्यासाठी मार्गात महाराष्ट्राच्या हद्दीतून वाहतूक होत असल्यास राज्यातील ज्या जिल्ह्यात मळी प्रथम प्रवेश करेल त्या जिल्हाअधीक्षकांकडून महाराष्ट्र थेट वाहतूक नियम १९९७च्या नियम ३ अन्वये थेट वाहतूक परवाना नमुना "टीटीपी"रु.१००/-परवाना शुल्काचा भरणा करुन वाहतूकदारास मंजूर करुन द्यावा लागेल. तसेच दिनांक ६.१२.१९९६च्या अधिसूचनेनुसार सदर मळीवर प्रति टन रु.५०/-पर्यवेक्षण शुल्क आकारणे आवश्यक राहिल. सदर पर्यवेक्षण शुल्क वसुलीची जबाबदारी नमुना "टीटीपी"मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात येत आहे. ज्या जिल्ह्यातून मळी राज्याबाहेर निर्यात होईल त्या जिल्ह्याच्या तपासणी नाका[चेक पोस्ट]वर मळी निर्यातीची नोंद घेण्यात येईल.

ब. परराज्यातून आलेली मळीची वाहतूक सीमा शुल्क सरहद्दीबाहेर [म्हणजेच परदेशात निर्यात]राज्यातील बंदरातून करावयाची असल्यास परिच्छेद ५-अप्रमाणेच कार्यवाही करण्यात येईल.

६]इतर

अ. भारताबाहेर मळी निर्यातदारांना मळीची साखर कारखान्यांकडून उचल केल्यापासून तसेच थेट वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांना "टीटीपी"परवाना मंजूर झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत मळी प्रत्यक्षात भारताबाहेर पाठविली आहे. याबद्दलचे सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. असे प्रमाणपत्र सादर न केल्यास साखर कारखाना व निर्यातदार/वाहतूकदारांच्या विरुद्ध मुंबई दारुबंदी कायदा १९४९च्या कलम ७०,८२ व १०४खाली कारवाई करता येऊ शकेल.

घ. प्रत्येक अनुज्ञप्ती अथवा परवाना मंजूर करणारे प्राधिकरण या परिपत्रकात नमूद केले आहेत. अनुज्ञप्ती नमुना "एम-४"व "एम-५"मंजुरी प्राधिकारी जिल्हाधिकारी आहेत याची नोंद घ्यावी.

[illegible] मुंबई मळी नियमावली, १९५५च्या नियम १७नुसार प्रत्येक एम ४/एम-५अनुज्ञप्ती धारकास महाराष्ट्रातील मळीची वाहतूक या विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या पर्यवेक्षणा खाली करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक ६.१२.१९९६च्या अधिसूचनेनुसार मळीची सीमा शुल्क सरहद्दी बाहेरची व थेट वाहतूक देखील पर्यवेक्षणाखाली होणे आवश्यक आहे.

ङ. या परिपत्रकातील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत कोठल्याही स्तरावर म्हणजेच परवाना मंजूर करणारे प्राधिकारी, शुल्क वसुली व. जबाबदारी निश्चित करण्यात आलेले अधिकारी तसेच निरीक्षण पथकाने त्रुटी निदर्शनास आणल्यास कसूरदार व्यक्तींस शासकीय कामात हलगर्जीपणा केल्याबद्दल शिस्तभंगाच्या कारवाईस सामोरे जावे लागेल याची नोंद घ्यावी.

-----

आनंद श्री. कुलकर्णी
[आनंद श्री. कुलकर्णी]
आयुक्त

प्रति

१]सर्व जिल्हाधिकारी यांना सस्नेह
२]सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क
३]सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
४]या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी
५]अभिलेख शाखा ५ प्रति

सो.सु.क.१४.११.२०००/५